आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
२३ फेब्रुवारी २०२५ रविवार

**ठळक बातम्या**

- अंतराळ क्षेत्र तसंच कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातला युवकांचा वाढता सहभाग नव्या क्रांतीला जन्म देत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं 'मन की बात' या कार्यक्रमात प्रतिपादन

- ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा समारोप सोहळा सुरु, सीमा भागातल्या मराठी भाषकांना न्याय मिळवून देण्याची उपमुख्यमंत्री अजित पवार यांची ग्वाही

- शिवरायांच्या १२ किल्ल्यांना युनेस्कोचा जागतिक वारसा दर्जा मिळवण्याकरता राज्य सरकारचं शिष्टमंडळ पॅरिसला रवाना

**आणि**

- आयसीसी चँपियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत दुबईत सुरु असलेल्या सामन्यात पाकिस्तानचं भारतापुढं विजयासाठी २४२ धावांचं आव्हान

**<><><><><>**

अंतराळ क्षेत्र तसंच कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातला भारतीय युवकांचा वाढता सहभाग नव्या क्रांतीला जन्म देत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. प्रधानमंत्र्यांनी आकाशवाणीवर 'मन की बात' या कार्यक्रमाच्या माध्यमातून आज जनतेशी संवाद साधला. हा या कार्यक्रमाचा ११९वा भाग होता. नवनवीन तंत्रज्ञान स्वीकारून त्याचा अवलंब करण्यात भारतातील लोक कोणापेक्षाही मागे नसल्याचं ते म्हणाले.

गेल्याच महिन्यात इस्रोचं शंभरावं रॉकेट प्रक्षेपण झाल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं....

**होल्ड मोदी बाईट MKB ISRO**

इसरोच्या यशाचा परीघ खूपच मोठा असल्याचं सांगत इस्रोच्या स्थापनेपासून आत्तापर्यंत गाठलेल्या यशाचा आढावा त्यांनी घेतला. कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातही भारत वेगानं आपली ओळख प्रस्थापित करत असल्याचं ते म्हणाले. या क्षेत्राशी संदर्भात पॅरीस इथं झालेल्या परिषदेत भारताच्या प्रगतीचं जगानं कौतुक केल्याचा अनुभव त्यांनी श्रोत्यांना सांगितला.

येत्या काही दिवसात आपण राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करणार असल्याचं स्मरण करून देताना त्यांनी मुलांना विज्ञानाची आवड असणं गरजेचं असल्याचं सांगितलं. यादृष्टीनं 'वैज्ञानिक म्हणून एक दिवस' ही कल्पना त्यांनी मांडली. नागरिकांनी आपल्या सोयीचा दिवस निवडून त्या दिवशी एक शास्त्रज्ञ, एक वैज्ञानिक म्हणून जगून पाहावं, संशोधन प्रयोगशाळा, तारांगणं किंवा अंतराळ संशोधन केंद्रांना भेट द्यावी, असं आवाहन त्यांनी केलं.

यंदाच्या महिला दिनानिमीत्त ८ मार्च रोजी, एका दिवसासाठी आपण आपल्या समाजमाध्यमांची खाती देशातल्या काही प्रेरणादायी महिलांकडे सोपवणार आहोत. या खात्यांवर त्या त्यांचं काम, त्यांच्या समोरची आव्हानं, अनुभव देशवासियांना सांगतील, असं ते म्हणाले. या उपक्रमात सहभागी होण्यासाठी महिलांनी नमो ॲपवर तयार केलेल्या मंचाच्या माध्यमातून सहभागी होण्याचं आवाहन त्यांनी केलं.

उत्तराखंडमध्ये झालेल्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतल्या यशवंतांचं त्यांनी अभिनंदन केलं. यावेळी त्यांनी इतर पदक विजेत्यांसह महाराष्ट्रातल्या किरण म्हात्रे, तेजस शिरसे या खेळाडूंचा उल्लेख केला. एक तंदुरुस्त आणि निरोगी राष्ट्र बनण्यासाठी भारताला लठ्ठपणाच्या समस्येवरही मात करावी लागेल, असं प्रधानमंत्री म्हणाले. या अनुषंगानं आपल्या आहारातला खाद्य तेलाचा वापर दहा टक्क्यांनी कमी करण्याचं आवाहन त्यांनी श्रोत्यांना केलं.

**होल्ड मोदी बाईट MKB OBESITY**

देशातली वैशिष्ट्यपूर्ण जैवविविधता आणि आपल्या स्थानिक संस्कृतीमधलं त्याचं स्थान याबद्दलची माहिती प्रधानमंत्र्यांनी दिली. महाराष्ट्रात वाघोबाची पूजा करण्याची परंपरा असल्याचा उल्लेख त्यांनी केला. या जैवविविधतेच्या जतन संवर्धन आणि संरक्षणासाठी देशभरातला आदिवासी समाज करत असलेल्या प्रयत्नांचं त्यांनी कौतुक केलं. यामुळेच देशात वाघ, बिबटे, आशियाई सिंह, गेंडे आणि बारशिंगा अशा प्राण्यांची संख्या झपाट्यानं वाढू लागली असल्याचं ते म्हणाले.

<><><><><>

राज्य सरकार सीमा भागातल्या मराठी भाषकांच्या पाठीशी खंबीरपणे उभं असून त्यांना न्याय मिळवून दिला जाईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली आहे. ते आज दिल्ली इथं आयोजित ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या समारोप सोहळ्यात बोलत होते. मराठी भाषेच्या प्रचार प्रसारासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही, अशी ग्वाहीदेखील पवार यांनी दिली

दिल्लीत राहणाऱ्या मराठी माणसांना बोलता भेटता यावं यासाठी स्थान निर्माण केलं जाईल, त्यासाठी अर्थसंकल्पात घोषणा केली जाईल, असं पवार यांनी सांगितलं. तुळापूर आणि वढू इथं छत्रपती संभाजी महाराजांचं दिमाखदार स्मारक व्हावं यासाठी सरकार काम करत असल्याचं सांगत पवार यांनी संभाजी महाराजांच्या साहित्यप्रेमाचं आणि साहित्यकृतीचा गौरवपूर्ण उल्लेख केला. संमेलन समाजातल्या सर्व घटकांपर्यंत पोहोचायला हवं, आधुनिक ज्ञान-विज्ञान मराठी भाषेत उपलब्ध व्हायला हवं, असं ते म्हणाले. नवोदित साहित्यकांना प्रोत्साहन मिळण्याची गरज अजित पवार यांनी व्यक्त केली.

महाराष्ट्रभूमीसाठी सदैव झटत राहू, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. तालकटोरा स्टेडिअमला असलेल्या ऐतिहासिक वारशाचा उल्लेख

करून मराठी सारस्वतांनी आज आपल्या विचारांनी दिल्ली जिंकली असल्याचं, शिंदे म्हणाले. दिल्लीतल्या जवाहरलाल नेहरू विद्यापीठात कुसुमाग्रज अध्यासन केंद्र लवकरच होईल, असं मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी सांगितलं. प्रवासी साहित्य संमेलन दरवर्षी व्हावं, त्यासाठी कुठलीही कमतरता भासणार नाही, असंही सामंत यांनी सांगितलं.

**<><><><><>**

विधानसभा आणि विधानपरिषद कामकाज सल्लागार समितीची बैठक आज मुंबईत विधानभवनात झाली. यावेळी अधिवेशनाच्या कामकाजाबाबत चर्चा करण्यात आली.

विधिमंडळाचं अर्थसंकल्पीय अधिवेशन मुंबईत ३ मार्च ते २६ मार्च या कालावधीत होणार आहे. राज्याचा अर्थसंकल्प १० मार्चला विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात मांडण्यात येईल.

अर्थसंकल्पीय अधिवेशन कालावधीत ८ मार्चला सार्वजनिक सुटीच्या दिवशी विधिमंडळाचे कामकाज सुरू राहील, तर दि. १३ मार्चला होळीनिमित्त कामकाजास सुटी देण्याचं आजच्या बैठकीत ठरवण्यात आलं.

**<><><><><>**

संत गाडगेबाबा यांची जयंती आज राज्यभरात साजरी झाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आपल्या शासकीय निवासस्थानी गाडगेबाबा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंत्रालयात संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली.

नाशिक इथं महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठात संत गाडगेबाबा यांची जयंती साजरी झाली. नाशिकच्या पोलीस उपायुक्त पद्मजा बढे यांनी गाडगेबाबा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला.

**<><><><><>**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांना युनेस्कोचा जागतिक वारसा दर्जा मिळवण्यासाठीच्या प्रस्तावाच्या सादरीकरणासाठी राज्य सरकारचं चार सदस्यीय शिष्टमंडळ आज पॅरिसला रवाना झालं. सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्या नेतृत्वाखालच्या या शिष्टमंडळात अपर मुख्य सचिव विकास खारगे, पुरातत्व आणि वस्तुसंग्रहालय संचालनालयाचे उप संचालक हेमंत दळवी आणि वास्तुविशारद शिखा जैन यांचा समावेश आहे.

राज्य शासनानं 'मराठा लष्करी भूप्रदेश' या संकल्पनेअंतर्गत हा प्रस्ताव सादर केला आहे. या किल्ल्यांमध्ये रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग, खांदेरी किल्ला आणि तामिळनाडूतल्या जिंजी या किल्ल्यांचा समावेश आहे.

**<><><><><>**

राज्यातल्या बाजार समित्यांच्या विविध विषयांसंदर्भात संवाद साधण्यासाठी उद्या पुण्यात बाजार समित्यांच्या राज्यस्तरीय परिषदेचं आयोजन केल्याची माहिती पणन मंत्री आणि महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे अध्यक्ष जयकुमार रावल यांनी दिली. या परिषदेत राज्यातल्या सर्व बाजार समित्यांचे सभापती, उपसभापती, संचालक आणि सचिव सहभागी होणार आहेत. पुण्याच्या महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळानं ही परिषद बाणेरमधल्या बंटारा भवन इथं आयोजित केली असून उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याहस्ते या परिषदेचं उद्घाटन होणार आहे. कृषी मंत्री माणिकराव कोकाटे, हेही या परिषदेला उपस्थित राहणार आहेत.

राज्यातल्या ३०५ बाजार समित्या आणि त्यांच्या ६२३ उप बाजारांच्या माध्यमातून शेतमालाच्या विक्री व्यवस्थेत कालानुरूप बदल घडविणं, शेतमालाच्या विपणनामध्ये आधुनिक बाबींचा अंगीकार करणं, शेतकरी आणि इतर सर्व बाजार घटकांना द्यायच्या सोई-सुविधा, त्यात येणाऱ्या अडचणी आणि त्यावर करावयाच्या उपाय योजना आदी विषयांसंदर्भात या परिषदेमध्ये चर्चा केली जाणार आहे.

<><><><><>

कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग, डेटा सायन्स, सायबर सुरक्षा अशा प्रगत क्षेत्रात शिक्षण देऊन अमरावती विद्यापीठाने रोजगारक्षम विद्यार्थी घडवावेत, असं आवाहन महाराष्ट्राचे राज्यपाल आणि कुलपती सी. पी. राधाकृष्णन यांनी आज केलं. अमरावती विद्यापीठाच्या ४१व्या दीक्षांत समारंभात ते बोलत होते. संस्कृत, पाली, इंग्रजी, हिंदी आणि भारतातील इतर भाषांमध्ये साठवलेले ज्ञान मराठीत भाषांतरित व्हावं, जेणेकरून सामान्य माणसाला त्याचा फायदा होईल, असं आवाहनही यावेळी राधाकृष्णन यांनी केलं.

<><><><><>

आयसीसी चँपियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत आज दुबईत सुरु असलेल्या सामन्यात पाकिस्ताननं भारतापुढं विजयासाठी २४२ धावांचं आव्हान ठेवलं आहे.

पाकिस्ताननं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला. सोद शकीलनं सर्वाधिक ६२ धावा, तर कर्णधार महंमद रिझवाननं ४६ धावा केल्या. खुशदिल शाहानं ३८ धावांच योगदान दिलं. भारतातर्फे कुलदीप यादवनं ३, तर हार्दिक पंडयानं २ गडी बाद केले.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा भारताच्या  ४ षटकात बिनबाद २६ धावा झाल्या होत्या.

<><><><><>

गेल्या चोवीस तासात, मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी, तर कोकणात काही ठिकाणी किमान तापमानात लक्षणीय वाढ झाली. मराठवाड्यात तुरळक ठिकाणी किंचित वाढ झाली.

राज्यात सर्वात कमी किमान तापमान जळगाव इथं १४ अंश सेल्सिअस इतकं  नोंदवलं गेलं.

येत्या दोन दिवसात, कोकणात तुरळक ठिकाणी उष्ण आणि दमट वातावरण राहण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे. मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात हवामान कोरडं राहील.

//<><><><><>//